रांगोळीच्या सप्तरंगात
सुखाचे दीप उजळू दे...
लक्ष्मीच्या पावलांनी घर
सुख समृदीने भरू दे...!

दैनिक
राज्य लोकतंत्र

लक्ष्मी पुजन
निमित्त सर्वांना
मंगलमय शुभेच्छा..!

www.epaper.rajyaloktantra.com
नवी दिशा... नवे विचार.....
email:rajyaloktantra75@gmail.com
● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–२२८ | रविवार दि.०८ नोव्हेंबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

फार्मर आयडीपासून वंचित १ लाख ६० हजार शेतकऱ्यांना दिलासा!

जमीन वाटपाचा किंवा प्रत्यक्ष शेतीचा २०१५ पूर्वीचा एक पुरावा पुरेसा; राज्य सरकारकडून विशेष एसओपी निश्चित, सरकारी योजनांचे लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा

नागपूर । प्रतिनिधी

ॲग्रीस्टॅक अभियानांतर्गत फार्मर आयडी (शेतकरी ओळख क्रमांक) नसल्यामुळे केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांच्या लाभापासून वंचित राहिलेल्या राज्यातील १ लाख ६० हजार शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. या सर्व पात्र शेतकऱ्यांना फार्मर आयडी देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असून, त्यासाठी विशेष मानक कार्यपद्धती (एसओपी) निश्चित करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारकडून शेतकऱ्यांना ही दिवाळीची भेट असल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी (दि. ७) नागपुरात माध्यमांशी बोलताना दिली.



राज्यातील अनेक शेतकरी प्रत्यक्ष शेती करीत असतानाही महसुली अभिलेखांमध्ये जमीनधारणा किंवा शेतीखालील क्षेत्राची पुरेशी माहिती उपलब्ध नसल्याने फार्मर आयडी नोंदणीपासून वंचित राहिले आहेत. उत्तर महाराष्ट्रातील जहागीरदार, मराठवाड्यातील मदतमास आणि खिंदमतमास तसेच विदर्भातील सीलिंग कायद्यांतर्गत जमिनी असलेल्या शेतकऱ्यांना या अडचणींचा सामना करावा लागत आहे. परिणामी, प्रत्यक्ष शेती करणाऱ्या शेतकऱ्यांनाही सरकारी योजनांच्या लाभापासून दूर राहावे लागत होते. या पार्श्वभूमीवर सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. १ जानेवारी २०१५ पूर्वी जमीन वाटप झाल्याचा किंवा संबंधित जमीन कसत असल्याचा एक जरी पुरावा उपलब्ध असेल, तर अशा पात्र शेतकऱ्यांना फार्मर आयडी देण्यात येणार आहे. यासाठी शासनाने ◀◀ पान २ वर

ई २० पेट्रोलमध्ये इथेनॉलचे प्रमाण ३१ टक्क्यांपर्यंत

राहुल गांधींचा पेट्रोल कंपन्यांवर गंभीर आरोप!

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

ई २० पेट्रोलमध्ये निर्धारित २० टक्क्यांपेक्षा अधिक इथेनॉल मिसळले जात असल्याचा गंभीर आरोप लोकसभेतील विरोधी पक्षनेते तथा काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी केला आहे. कर्नाटकातील मान्यताप्राप्त प्रयोगशाळेत करण्यात आलेल्या तपासणीत १४ पैकी ११ नमुन्यांमध्ये इथेनॉलचे प्रमाण २० टक्क्यांपेक्षा जास्त आढळल्याचा दावा त्यांनी केला आहे. काही नमुन्यांमध्ये हे प्रमाण तब्बल ३० ते ३१ टक्क्यांपर्यंत असल्याचे सांगत



त्यांनी पेट्रोल कंपन्या ग्राहकांची फसवणूक करत असल्याचा आरोप केला आहे.

राहुल गांधी यांनी यासंदर्भात सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर पोस्ट करत पेट्रोल कंपन्यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यांच्या दाव्यानुसार, इंडियन ऑईल कॉर्पोरेशन आणि हिंदुस्तान ◀◀ पान २ वर

यूजीसीच्या समानता नियमांवरून केंद्र सरकारची माघार; पुनरावलोकनासाठी उच्चस्तरीय समिती

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) २०२६ मधील समानता नियमांवरून देशभरात राजकीय वातावरण तापले असताना केंद्र सरकारने सावध भूमिका घेत नियमांच्या पुनरावलोकनासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. उच्च शिक्षण संस्थांमधील जातीय भेदभाव रोखण्यासाठी तयार करण्यात आलेल्या नव्या नियमांमध्ये ओबीसी वर्गाचाही समावेश करण्यात आला आहे. मात्र, या नियमांमधील तरतुदी आणि कथित खोट्या तक्रारींच्या गैरवापराच्या शक्यतेवरून सवर्ण समाजाने तीव्र विरोध दर्शविला आहे. त्यामुळे केंद्र सरकारला एक पाऊल मागे घ्यावे लागल्याचे राजकीय चित्र आहे. ◀◀ पान २ वर

आष्टी तालुक्यात वाघाच्या हल्ल्यात शेतकऱ्याचा मृत्यू

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यात वाघाच्या हल्ल्यात एका शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. देवळाली येथील शेतकरी देविदास टकले यांच्यावर लोखंडवाडी–सोनेपठार परिसरात वाघाने हल्ला केल्याचे सांगितले जात आहे.

जनावरांसाठी गवत कापत असताना पाठीमागून झडप घालत वाघाने त्यांना जंगलात फरफटत नेले. तब्बल अर्धा किलोमीटरपर्यंत फरफटत नेल्यानंतर वाघाने त्यांच्या शरीराचे लचके तोडले. मुलाच्या आरडाओरडीनंतर वाघाने घटनास्थळावरून पळ काढला. मात्र, तोपर्यंत देविदास टकले यांचा मृत्यू झाला होता. दुष्काळी परिस्थितीमुळे जनावरांसाठी चारा शोधण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. चारा छावण्या सुरू नसल्याने मुक्या जनावरांची भूक ◀◀ पान २ वर









अग्रलेख

सहकाराचा 'स्वार्थ-कार' आणि गोकुळचा बळी

महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा असलेल्या सहकार क्षेत्राची मूळ संकल्पना ही सहकारातून समृद्धी अशी होती. शेतकरी, कष्टकरी आणि तळागाळातील घटकांना एकत्र आणून आर्थिक स्वयंपूर्णता मिळवणे हा त्यामागचा उदात्त हेतू होता. मात्र, वर्तमानात महाराष्ट्राच्या राजकारणाने या संकल्पनेला पुरते ओरबाडून काढले असून, आता सहकारातून सत्ता आणि खुर्ची असा नवा पायंडा पडताना दिसत आहे. या राजकीय साठमारीचा ताजा बळी ठरतोय तो पश्चिम महाराष्ट्राची आर्थिक वाहिनी आणि कोल्हापूरची अस्मिता असलेला 'गोकुळ' (कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ).

गोकुळ हा केवळ एक दूध संघ नसून, ५ लाखांहून अधिक शेतकरी कुटुंबांचा जीवनधार आहे. ३,५०० हून अधिक प्राथमिक दूध संस्थांशी जोडलेल्या या संघाचे दैनिक संकलन १४ ते १५ लाख लीटर इतके प्रचंड असून, वार्षिक टर्नओव्हर ३,५०० कोटी रुपयांहून अधिक आहे. दुधाचे हे संकलन आणि त्यासोबत येणारा अथांग पैसा हीच राजकीय नेत्यांसाठी सर्वात मोठी 'मलाई' ठरली आहे. कोल्हापूरच्या राजकारणात असा एक अलिखित नियम मानला जातो की, ज्याची सत्ता गोकुळवर, त्याचाच वरचष्मा संपूर्ण जिल्ह्यावर! म्हणूनच, राज्यातील सत्तांतराच्या लाटा ज्या-ज्या वेळी उठतात, त्या-त्या वेळी गोकुळच्या अध्यक्षपदाची आणि संचालक मंडळाची खुर्ची बळकावण्यासाठी सत्ताधाऱ्यांची चढाओढ सुरू होते. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील (सेक्शन ९७- के व संबंधित कलमे) तरतुदींनुसार, सहकारी संस्थांचे कामकाज सुरळीत चालावे यासाठी राज्य सरकारला काही विशिष्ट परिस्थितीत सरकारी प्रतिनिधी नियुक्त करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. परंतु, दुर्दैवाने या कायद्याचा वापर सहकाराच्या सक्षमीकरणापेक्षा राजकीय समीकरणांसाठीच जास्त केला जात आहे. मे २०२१ मध्ये गोकुळवर महाविकास आघाडीच्या काळात आमदार सतेज पाटील आणि हसन मुश्रीफ यांच्या गटाची सत्ता आली. त्यानंतर जून २०२२ मध्ये महाराष्ट्रात राजकीय परिवर्तन घडले आणि महायुती सरकार सत्तेवर आले. सत्तेची सूत्रे हाती येताच, सप्टेंबर २०२३ ते २०२४ या काळात महायुती सरकारने तत्परता दाखवत गोकुळवर थेट ५ सरकारी संचालक नियुक्त केले. आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि उत्तम नफ्यात चालणाऱ्या गोकुळसारख्या स्वायत्त संस्थेला चालवण्यासाठी खरोखरच सरकारचा पाठींबा किंवा कुबड्यांची गरज होती का? तर स्पष्ट उत्तर 'नाही' असेच आहे. ही गरज गोकुळची नसून केवळ सत्ताधाऱ्यांच्या राजकीय फायद्याची होती. ज्या संचालकांना ५ लाख दूध उत्पादक शेतकऱ्यांनी मत देऊन निवडून दिलेले नाही, ते थेट मंत्रालयातील एका आदेशाच्या बळावर बैठकीत येऊन बसतात, हा सहकार तत्त्वाचा आणि लोकशाही प्रक्रियेचा थेट अवमान आहे. या ५ सरकारी संचालकांच्या नियुक्तीमागील खरा हेतू अध्यक्षांच्या निवडीत आणि धोरणात्मक निर्णयांमध्ये 'मतदानाचा अधिकार' वापरून वर्चस्व मिळवणे हाच असतो. पहाटे चार वाजता उठून शेण-मूत्र उपटणारा, ढोरकष्ट करून केंद्रावर दूध घालणारा शेतकरी वर्षभर राबतो; मात्र गोकुळचा अध्यक्ष कोण होणार, याचे निर्णय मुंबईतील मंत्रालयातील आकांशी बांधलेले हे नियुक्त संचालक घेतात. याविरोधात मुंबई उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्या. न्यायालयाने काही प्रकरणात स्थगिती दिली, तर काही वेळा या हस्तक्षेपावर कडक ताशेरेही ओढले. परंतु, न्यायव्यवस्थेने एका दरवाज्याने बाहेर काढले तरी राजकीय अध्यादेशांच्या खिडकीतून पुन्हा आत शिरण्याची चलाखी आपल्या राजकीय व्यवस्थेने साधली आहे. या सर्व सत्ताकारणाच्या सर्कशीत खरा भरडला जातोय तो निष्पाप दूध उत्पादक शेतकरी. जेव्हा पशुखाद्याचे दर गगनाला भिडतात किंवा दुधाला रास्त भाव मिळण्यासाठी लढा उभारण्याची गरज असते, तेव्हा हे नियुक्त संचालक मूग गिळून बसतात. दुधाची विक्री वाढवणे, प्रक्रिया उद्योगाचा विस्तार करणे यापेक्षा 'आपल्या माणसांना कंत्राटे कशी मिळतील' यावरच भर दिला जातो.

कै. वैकुंठभाई मेहता आणि धनंजयराव गाडगीळ यांनी शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी उभारलेल्या सहकार चळवळीचे आज 'सत्ता-कारात' रूपांतर झाले आहे. सरकारांनी आणि राजकीय पक्षांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, ५ किंवा ५० संचालक नियुक्त करून संस्था ताब्यात घेता येतील; परंतु शेतकऱ्यांच्या मनात पसरलेला असंतोष डावलता येणार नाही. दुधाचा हा फेसाळलेला राग जेव्हा मतपेटीतून बाहेर पडेल, तेव्हा सहकाराचा गळा घोटणाऱ्या या राजकीय समीकरणांचे गणित कोलमडल्याशिवाय राहणार नाही.!

पान १ वरून...

ई २० पेट्रोलमध्ये इथेनॉलचे

पेट्रोलियम कॉर्पोरेशनच्या पेट्रोल नमुन्यांमध्ये अनुक्रमे ३१.२ टक्के आणि ३०.५ टक्के इथेनॉल आढळले आहे. विशेष म्हणजे, कंपन्यांच्या प्रयोगशाळांनी तपासणी अहवालात इथेनॉलचे नेमके प्रमाण नमूद केले नसल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. ई २० आता ४२० मध्ये रूपांतरित झाले आहे. लोकांच्या गाड्यांमधून पेट्रोलची चोरी होत आहे. सरकार आणि खासगी कंपन्या ठरलेल्या मानकापेक्षा अधिक इथेनॉल पेट्रोलमध्ये मिसळत आहेत. ग्राहक महागड्या पेट्रोलचे पैसे मोजत असताना त्यांच्या वाहनांच्या टाकीत मात्र अपेक्षेपेक्षा अधिक इथेनॉल भरले जात आहे,' अशा शब्दांत राहुल गांधी यांनी सरकारवर निशाणा साधला. पेट्रोलमध्ये निर्धारित प्रमाणापेक्षा अधिक इथेनॉल मिसळल्यास त्याचा थेट परिणाम वाहनधारकांच्या खिशावर होऊ शकतो, असा दावा राहुल गांधी यांनी केला आहे. इथेनॉलचे प्रमाण वाढल्यास वाहनांचे मायलेज कमी होण्याची शक्यता असून देखभाल आणि दुरुस्तीचा खर्चही वाढू शकतो, असे त्यांनी म्हटले आहे. सर्व वाहने अधिक इथेनॉलयुक्त इंधनासाठी तयार केलेली नसल्याने त्यांच्या कार्यक्षमतेवर आणि इंजिनच्या देखभालीवर परिणाम होण्याची भीतीही त्यांनी व्यक्त केली. पेट्रोलमध्ये नेमके किती टक्के इथेनॉल मिसळले आहे, याची स्पष्ट माहिती ग्राहकांना पेट्रोल पंपांवर दिली जात नसल्याचा मुद्दाही राहुल गांधी यांनी उपस्थित केला. इंधनाच्या गुणवत्तेबाबत पारदर्शकता असणे आवश्यक असून ग्राहकांना ते खरेदी करत असलेल्या पेट्रोलमधील इथेनॉलचे प्रमाण समजले पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे. दरम्यान, राहुल गांधी यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे या प्रकरणी स्पष्टीकरण मागितले आहे. देशभरात वितरित होणाऱ्या पेट्रोलमध्ये प्रत्यक्षात किती टक्के इथेनॉल मिसळले जात आहे, निर्धारित मानकांचे उल्लंघन होत असल्यास संबंधित कंपन्यांवर कोणती कारवाई केली जाणार, असे सवाल त्यांनी उपस्थित केले आहेत. या मुद्द्यावर सरकारने थेट चर्चेला यावे, असे आव्हानही राहुल गांधी यांनी दिले आहे. मात्र, प्रयोगशाळेतील नमुन्यांचे तपासणी अहवाल, त्यांची अधिकृत पडताळणी आणि संबंधित पेट्रोलियम कंपन्यांची भूमिका याबाबत स्पष्टता येणे आवश्यक आहे. त्यामुळे या आरोपांवर केंद्र सरकार आणि संबंधित कंपन्या काय भूमिका घेतात, याकडे आता लक्ष लागले आहे.

फार्मर आयडीपासून वंचित १ लाख

स्वतंत्र एसओपी निश्चित केली असून, महसुली अभिलेखांमध्ये अपुरी माहिती असलेल्या शेतकऱ्यांनाही डिजिटल कृषी व्यवस्थेत समाविष्ट होण्याचा मार्ग खुला झाला आहे. फार्मर आयडी नसल्यामुळे किमान १ लाख ६० हजार शेतकरी सरकारी मदतीपासून वंचित असल्याचे बावनकुळे यांनी स्पष्ट केले. नव्या निर्णयामुळे या शेतकऱ्यांना फार्मर आयडी मिळाल्यानंतर विविध सरकारी योजनांचे लाभ, अनुदान, पीक कर्ज, पीकविमा आणि डिजिटल कृषी सेवांचा लाभ घेणे शक्य होणार आहे. विशेष म्हणजे, फार्मर आयडी देण्याच्या या प्रक्रियेमुळे संबंधित जमिनीच्या मालकी हक्कात किंवा महसुली अभिलेखांतील विद्यमान नोंदींमध्ये कोणताही बदल होणार नाही. त्यामुळे प्रत्यक्ष शेती करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना डिजिटल व्यवस्थेत समाविष्ट करताना जमिनीच्या मालकीसंदर्भातील नोंदी कायम राहणार आहेत. ग्रीस्टॅक नोंदणी अधिक सुलभ आणि सर्वसमावेशक करण्याच्या दृष्टीने राज्य सरकारचा हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

यूजीसीच्या समानता नियमांवरून केंद्र सरकारची

२०१२ च्या जुन्या नियमांमध्ये अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना जातीय भेदभावापासून संरक्षण देण्याची तरतूद होती. मात्र, २०२६ च्या नव्या नियमांमध्ये इतर मागासवर्गीय (ओबीसी) विद्यार्थ्यांचाही समावेश करण्यात आला. सामाजिक न्यायाच्या दृष्टीने या निर्णयाचे दलित, आदिवासी आणि ओबीसी संघटनांनी स्वागत केले; परंतु नियमांमधील तक्रार निवारण प्रक्रिया, कथित खोट्या तक्रारी आणि त्यावरील कारवाईच्या तरतुदींच्या अभावाबाबत सवर्ण समाजाने आक्षेप घेतला. या विरोधाचे पडसाद आंदोलनांच्या माध्यमातून उमटू लागल्याने केंद्र सरकारसमोर पेच निर्माण झाला आहे. विशेषतः आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उत्तर प्रदेशमध्ये या मुद्द्याचे राजकीय महत्त्व वाढले आहे. राज्यात सुमारे २२ टक्के सवर्ण, ४३ टक्के ओबीसी आणि २१ टक्के अनुसूचित जातीचे मतदार असल्याचे सांगितले जाते. भाजपचा पारंपरिक मतदार मानल्या जाणाऱ्या सवर्ण समाजाची नाराजी परवडणारी नाही, तर सत्तेच्या राजकारणात निर्णायक ठरणाऱ्या ओबीसी वर्गालाही दुखावणे पक्षाला शक्य नाही. त्यामुळे दोन्ही समाजघटकांमध्ये समतोल साधण्याचे मोठे आव्हान भाजपसमोर उभे राहिले आहे. भाजपच्या उत्तर प्रदेशातील एका वरिष्ठ नेत्याने या संदर्भात भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, उच्च शिक्षण संस्थांमधील जातीय भेदभाव रोखण्यासाठी नियमांचा आवाका वाढवून ओबीसींचा समावेश करण्यास कोणाचाही विरोध नव्हता. मात्र, भेदभावाच्या नावाखाली खोट्या तक्रारी दाखल झाल्यास तक्रारदारांवर कारवाई किंवा दंडाची तरतूद नसणे, ही सवर्ण समाजाची प्रमुख चिंता आहे. त्यामुळे हा विषय आता पक्षासाठी कळीचा बनला आहे. दरम्यान, भाजपचे उत्तर प्रदेश प्रभारी विनोद तावडे यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून समिती स्थापनेमागील भूमिका स्पष्ट केली. कोणत्याही वर्गातील विद्यार्थ्यांवर अन्याय किंवा भेदभाव होऊ नये, याची काळजी घेणे हाच या समितीचा उद्देश असल्याचे त्यांनी नमूद केले. या वादात राष्ट्रीय स्वयंसेवक संघानेही भूमिका मांडली आहे. इंदूर येथे झालेल्या संघाच्या बैठकीनंतर राष्ट्रीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी यूजीसीचे परिपत्रक असंतुलित असल्याचे संघाचे मत असल्याचे स्पष्ट केले. या संदर्भातील माहिती संघाने सरकारच्या निदर्शनास आणून दिली होती. त्यानंतर सरकार आणि यूजीसीने या प्रश्नाची दखल घेतली. सध्या हे प्रकरण न्यायालयात असून सरकार पुनरावलोकन समिती स्थापन करीत असल्याचेही त्यांनी सांगितले. एकीकडे जातीय भेदभाव रोखण्यासाठी कठोर नियमांची मागणी होत असताना दुसरीकडे नियमांच्या गैरवापराची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे नव्या नियमांचे पुनरावलोकन करताना विद्यार्थ्यांचे संरक्षण, तक्रारदारांची जबाबदारी आणि कोणत्याही समाजघटकावर अन्याय होणार नाही, यांचा समतोल साधणे केंद्र सरकारसाठी महत्त्वाचे ठरणार आहे. यूजीसीच्या या निर्णयाचे पडसाद केवळ शिक्षण क्षेत्रापुरते मर्यादित न राहता आगामी निवडणुकांच्या राजकारणावरही उमटण्याची शक्यता आहे.

आष्टी तालुक्यात वाघाच्या हल्ल्यात

भागवण्यासाठी शेतकऱ्यांना जीव धोक्यात घालून शेतात जावे लागत आहे. गेल्या तीन वर्षांत आष्टी तालुक्यात वाघ आणि बिबट्याच्या हल्ल्यात चार शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. देवळाली, बावी आणि धामणगाव परिसरात वाघाचा वावर वाढला असतानाही वनविभागाकडून ठोस उपाययोजना होत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. वाघाच्या हल्ल्यात शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, या परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेनंतर शेतकरी आक्रमक झाले असून वाघाचा तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

गेवराई शहरात सिलेंडर गॅस टाकीचा स्फोट, चौघेजण गंभीर जखमी, चार घरांना लागली आग

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई शहरातील संजयनगर भागात राहणारे सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मण चव्हाण यांच्या घरातील स्वयंपाकाच्या सिलेंडर गॅस टाकीचा स्फोट होऊन चार घरांना लागलेल्या आगीत चार जण गंभीर जखमी झाल्याची घटना शनिवार ता. ७ रोजी सायंकाळी सात वाजता घडली असून, अगदी दिवाळीच्या तोंडावरच घडलेल्या घटनेने सणासुदीचे सर्व साहित्य आगीत जळून गेले आहे. संसारोपयोगी वस्तूंसह, एक दुचाकी ही जळून खाक झाली आहे.

जखमींवर शहरातील गेवराई क्रिटिकल रूग्णालयात उपचार करण्यात आले असून, एका महिलेला संभाजीनगर येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले आहे.गेवराई शहरातील संजयनगर भागात लक्ष्मण चव्हाण यांचे घर असून, या परीसरात फटाके फोडून दिवाळीचा उत्साह सुरू होता. त्याच वेळी चव्हाण यांच्या स्वयंपाकघरातील सिलेंडर गॅसला अचानक आग लागून स्फोट झाला. तसेच,आजुबाजाच्या चार



घरांनाही आग लागून घरातील संसारोपयोगी साहित्य जळून खाक झाले. ठराविक अंतरावर पुन्हा एक मोठा स्फोट होऊन चार जण गंभीर जखमी झाले आहेत. वाजलेला फटाका पणतीवर पडून आग लागल्याचा अंदाज आहे. गेवराई कृषी उत्पन्न बाजार समिती व नपच्या टॅन्कर ने आग आटोक्यात आणण्यात यश आले. आगीत प्रकाश राठोड, लक्ष्मण चव्हाण यांच्यासह चार घरांचे मोठे नुकसान झाले असून, शिवराज पवार आसेफ, राजू पठाण, निहाल शेख, आरबाज, आमन समीर यांनी जखमींना रुग्णालयात दाखल करण्यासाठी लगबग केली.

जाहीर प्रगटन

मा.श्री.मिथून अ.शिंदे न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,पाटोदा यांच्या न्यायालयात

फौजदारी किरकोळ अर्ज/२०७/२०२६

अश्रुबा वि.ग्रामसेवक

अर्जदार:-आश्रुबा भीमराव मिसाळ, वय ६५ वर्षे.रा.डागाचीवाडी तहत अंमळले ता. पाटोदा जि. बीड ह. मु. एकनाथ नगर,धाकलगाव,ता.अंबड जि.जालना

विधिज्ञ :- श्री. एस. आर. नागरगोजे

विरुद्ध

गैरअर्जदार: -ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, अंमळनेर ता. पाटोदा जि.बीड

मागणी अर्ज:-रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्ट १९६९ अन्वये जन्माची नोंद घेण्याबाबत....

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात त्यांच्या स्वतःचा जन्माची नोंद ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, अंमळनेर ता. पाटोदा जि.बीड यांच्या जन्म मृत्यू रजिस्टरला घेण्याबाबत व जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदाराचा स्वतःचा नामे आश्रुबा भिमराव मिसाळ यांचा जन्म दिनांक ०२/१२/१९६१ रोजी मौजे डागाचीवाडी तहत अंमळनेर ता. पाटोदा जि.बीड ह.मु.एकनाथ नगर, धाकलगाव, ता. अंबड जि. जालना येथे झाला असुन अर्जदार यांना त्याच्या स्वतःचा जन्म प्रमाणपत्राची शासकीय, निमशासकीय व इतर कार्यालयीन कामाकरीता आवश्यकता आहे.

यामध्ये सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यांना त्यांच्या स्वतःचा जन्माची नोंद डागाचीवाडी तहत अंमळनेर ता. पाटोदा जि. बीड ह.मु. एकनाथ नगर, धाकलगाव, ता.अंबड जि. जालना येथील जन्म मृत्यू रजिस्ट्रला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणाची काही हरकत असेत तर ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय सदरहू अर्जदार ह्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांच्या हक्क शाबीत दिसल्यास त्यांना त्यांच्या जन्माची नोंद डागाचीवाडी तहत अंमळनेर ता. पाटोदा जि. बीड ह.मु. एकनाथ नगर, धाकलगाव, ता. अंबड जि. जालना येथील जन्म मृत्यु

रजिस्ट्रला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत देण्याबाबत आदेशित केले जाईल, याची नोंद घ्यावी. आज दिनांक ०७/११/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख १७/१२/२०२६ आहे.

आदेशावरून,
स्वाक्षरीत/-
सहाय्यक अधिक्षक, फौजदारी
न्यायालय, पाटोदा

जा.क्र.३३५८/२६
०७/११/२०२६

जाहीर प्रगटन

मा.श्री.मिथून अ.शिंदे न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,पाटोदा यांच्या न्यायालयात

फौजदारी किरकोळ अर्ज/२१५/२०२६

रेहान वि. ग्रामसेवक

अर्जदार :- रेहान तय्यूबखान पठाण, वय :- १९ वर्षे रा.नायगाव मयूर, ता.पाटोदा जि. बीड

विधिज्ञ :- श्री.जे.एस. पठाण विरुद्ध

गैर-अर्जदार :- ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, नायगांव मयुर, ता. पाटोदा जि. बीड

मागणी अर्ज : रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्ट १९६९ अन्वये जन्माची नोंद घेण्याबाबत....

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात त्यांच्या स्वतःचा जन्माची नोंद ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, नायगांव मयुर, ता. पाटोदा जि.बीड यांच्या जन्म मृत्यू रजिस्टरला घेण्याबाबत व जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदाराचा स्वतःचा नामे रेहान तय्यूबखान पठाण यांचा जन्म दिनांक १४/०४/२००८ रोजी मौजे नायगांव मयुर, ता. पाटोदा जि. बीड येथे झाला असुन अर्जदार यांना त्यांच्या स्वतःचा जन्म प्रमाणपत्राची शासकीय, निमशासकीय व इतर कार्यालयीन कामाकरीता आवश्यकता आहे.

यामध्ये सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यांना त्यांच्या स्वतःचा जन्माची नोंद नायगांव मयुर, ता. पाटोदा जि. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्ट्रला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणाची काही हरकत असेत तर ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय सदरहू अर्जदार ह्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांच्या हक्क शाबीत दिसल्यास त्यांना त्यांच्या जन्माची नोंद नायगांव मयुर, ता. पाटोदा जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्रला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल, याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०६/११/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख २१/१२/२०२६ आहे.

आदेशावरून,
स्वाक्षरीत/-
सहाय्यक अधिक्षक, फौजदारी
न्यायालय, पाटोदा

जा.क्र.३३५७/२६
०७/११/२०२६

जाहीर प्रगटन

मा.श्री.मिथून अ.शिंदे न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,पाटोदा यांच्या न्यायालयात

फौजदारी किरकोळ अर्ज/२१३/२०२६

पठाण वि. ग्रामसेवक

अर्जदार:-पठाण रईसाबी अनिसखाँ लग्नानंतर, पठाण रईसाबी महेबुब लग्नापुर्वी, वय :- ५५ वर्षे रा.नायगाव मयूर, ता.पाटोदा जि. बीड

विधिज्ञ:-श्री.जे.एस. पठाण विरुद्ध

गैर-अर्जदार :- ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, नायगांव मयुर, ता. पाटोदा जि. बीड

मागणी अर्ज:-रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्ट १९६९ अन्वये जन्माची नोंद घेण्याबाबत....

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात त्यांच्या स्वतःचा जन्माची नोंद ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, नायगांव मयुर, ता. पाटोदा जि.बीड यांच्या जन्म मृत्यू रजिस्टरला घेण्याबाबत व जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदाराचा स्वतःचा नामे पठाण रईसाबी अनिसखाँ लग्नानंतर, पठाण रईसाबी महेबुब लग्नापुर्वी यांचा जन्म दिनांक ०५/०७/१९७१ रोजी मौजे नायगांव मयुर, ता. पाटोदा जि. बीड येथे झाला असुन अर्जदार यांना त्यांच्या स्वतःचा जन्म प्रमाणपत्राची शासकीय, निमशासकीय व इतर कार्यालयीन कामाकरीता आवश्यकता आहे.

यामध्ये सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यांना त्यांच्या स्वतःचा जन्माची नोंद नायगांव मयुर, ता. पाटोदा जि. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्ट्रला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणाची काही हरकत असेत तर ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार ह्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन-, त्यांच्या हक्क शाबीत दिसल्यास त्यांना त्यांच्या जन्माची नोंद नायगांव मयुर, ता. पाटोदा जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्रला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल, याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०६/११/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशीदिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख २१/१२/२०२६ आहे.

आदेशावरून,
स्वाक्षरीत/-
सहाय्यक अधिक्षक, फौजदारी
न्यायालय, पाटोदा

जा.क्र.३३५२/२६
०७/११/२०२६

जाहीर प्रगटन

मा.श्री.मिथून अ.शिंदे न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,पाटोदा यांच्या न्यायालयात

फौजदारी किरकोळ अर्ज/२२१/२०२६

सिता वि. ग्रामसेवक

अर्जदार:-सिता यादव सानप लग्नापुर्वी, सिता साईनाथ खाडे-लग्नानंतर, वय :- ५८ वर्षे रा. वडझरी, ता. पाटोदा जि. बीड ह.मु. साईनाथ खाडे वंजारवाडी ता.जि.बीड

विधिज्ञ :- श्री. टी. डी. जाधव

विरुद्ध

गैर-अर्जदार :- ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, वडझरी, ता. पाटोदा जि.बीड

मागणी अर्ज : रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्ट १९६९ अन्वये जन्माची नोंद घेण्याबाबत....

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात त्यांच्या स्वतःचा जन्माची नोंद ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, वडझरी, ता. पाटोदा जि.बीड यांच्या जन्म मृत्यू रजिस्टरला घेण्याबाबत व जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदाराचा स्वतःचा नामे सिता यादव सानप लग्नापुर्वी, सिता साईनाथ खाडे लग्नानंतर यांचा जन्म दिनांक ०१/०१/१९६८ रोजी मौजे वडझरी, ता. पाटोदा जि.बीड येथे झाला असुन अर्जदार यांना त्यांच्या स्वतःचा जन्म प्रमाणपत्राची शासकीय, निमशासकीय व इतर कार्यालयीन कामाकरीता आवश्यकता आहे.

यामध्ये सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यांना त्यांच्या स्वतःचा जन्माची नोंद वड़झरी, ता. पाटोदा जि. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्ट्रला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणाची काही हरकत असेत तर ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय सदरहू अर्जदार ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांच्या हक्क शाबीत दिसल्यास त्यांना त्यांच्या जन्माची नोंद वडझरी, ता. पाटोदा जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्रला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल, याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०६/११/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख २२/१२/२०२६ आहे.

आदेशावरून,
स्वाक्षरीत/-
सहाय्यक अधिक्षक, फौजदारी
न्यायालय, पाटोदा

जा.क्र.३३५९/२६
०७/११/२०२६

जाहीर प्रगटन

मा.श्री.मिथून अ.शिंदे न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,पाटोदा यांच्या न्यायालयात

फौजदारी किरकोळ अर्ज/२३९/२०२६

प्रशांत वि.ग्रामसेवक

अर्जदार – प्रशांत अभिमान बोरखेडे, वय :- २६ वर्षे रा.येवलवाडी (स.) ता. पाटोदा जि. बीड

विधिज्ञ :- श्री.जे.एस.पठाण

विरुद्ध

गैर-अर्जदार :- ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, येवलवाडी (स.) ता.पाटोदा जि. बीड

मागणी अर्ज : रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्ट १९६९ अन्वये जन्माची नोंद घेण्याबाबत....

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात त्यांच्या स्वतःचा जन्माची नोंद ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, येवलवाडी (स.) ता. पाटोदा जि. बीड यांच्या जन्म मृत्यू रजिस्टरला घेण्याबाबत व जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदाराचा स्वतःचा नामे प्रशांत अभिमान बोरखेडे यांचा जन्म दिनांक २३/०७/२००० रोजी मौजे येवलवाडी (स.) ता. पाटोदा जि. बीड येथे झाला असुन अर्जदार यांना त्यांच्या स्वतःचा जन्म प्रमाणपत्राची शासकीय, निमशासकीय व इतर कार्यालयीन कामाकरीता आवश्यकता आहे.

यामध्ये सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरह् अर्जदार यांना त्यांच्या स्वतःचा जन्माची नोंद येवलवाडी (स.) ता. पाटोदा जि. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्ट्रला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणाची काही हरकत असेत तर ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरह् अर्जदार ह्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांच्या हक्क शाबीत दिसल्यास त्यांना त्यांच्या जन्माची नोंद येवलवाडी (स.) ता. पाटोदा जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्रला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल, याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०७/११/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख २३/१२/२०२६ आहे.

आदेशावरून,
स्वाक्षरीत/-
सहाय्यक अधिक्षक, फौजदारी
न्यायालय, पाटोदा

दैनिक
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार दि. ०८ नोव्हेंबर २०२६
३

थोडक्यात

आईच्या स्मृती जपण्याचा अनोखा निर्णय

बीड । प्रतिनिधी

कै. नीलावती परमेश्वर सानप यांचे दिनांक ६ नोव्हेंबर २०२६ रोजी वयाच्या ५५ व्या वर्षी दुःखद निधन झाले. त्यांच्या मुलगा आणि मुलींनी एक अत्यंत स्तुत्य, पर्यावरणपूरक आणि समाजप्रबोधन करणारा निर्णय घेतला. पारंपरिक पद्धतीनुसार अस्थी व राख गंगेत विसर्जित करण्याऐवजी आपल्या शेतामध्ये खड्डा खोदून त्यामध्ये राख ठेवली आणि त्या ठिकाणी आंब्याचे झाड लावण्याचा निर्णय घेतला.



विशेष म्हणजे, त्यांचा मुलगा सतीश परमेश्वर सानप हे भारतीय वायुसेनेमध्ये कार्यरत असून सध्या आसाम येथे देशसेवेचे कर्तव्य बजावत आहेत. देशसेवेच्या जबाबदारीमुळे आईच्या निधनानंतरही कर्तव्यावर असलेल्या मुलाच्या कुटुंबाने आईच्या स्मृती जपण्यासाठी घेतलेला हा पर्यावरणपूरक निर्णय निश्चितच कौतुकास्पद आहे. आईच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघणार नाही; मात्र त्यांच्या स्मृतींच्या रूपाने लावलेले हे आंब्याचे झाड भविष्यात मोठे होऊन अनेकांना सावली, गोड फळे आणि पर्यावरणाला मोलाचे योगदान देईल. सानप कुटुंबीयांनी घेतलेला हा निर्णय समाजासमोर एक आदर्श निर्माण करणारा आहे. मृत व्यक्तीच्या स्मृती वृक्षाच्या रूपाने जिवंत ठेवण्याचा सुंदर संदेश त्यांनी समाजाला दिला आहे.

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर बीड एलसीबीची धडक कारवाई

गावठी पिस्तूल व दोन जिवंत काडतुसांसह इंदूरचा आरोपी जेरबंद

बीड । प्रतिनिधी

दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर बीड शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंग करत असताना, रेकॉर्डवरील एका सराईत गुन्हेगाराला गावठी पिस्तूल व दोन जिवंत काडतुसांसह रंगेहात पकडण्यात आले. इंदूर (मध्य प्रदेश) येथील रहिवासी असलेल्या या आरोपीकडून सुमारे ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दि. ७ नोव्हेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक शेखर औटे व त्यांच्या पथकाला गोपनीय बातमीदाराकडून माहिती मिळाली की, करण दुर्गा भटनागर (वय ४२ वर्षे, रा. इंदूर, मध्य प्रदेश) हा बीड शहरातील सागर हाइट्स परिसरात महाराजा ट्रॅव्हल्स कार्यालयासमोर पिस्तूल बाळगून उभा आहे. मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे पथकाने तातडीने शिवाजी चौक परिसरात जाऊन संशयिताला ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याच्याकडील निळसर रंगाच्या बॅगमध्ये ४० हजार रुपये किमतीचे गावठी बनावटीचे लोखंडी



पिस्तूल (मॅगझिनसह) आणि २ हजार रुपयांची दोन जिवंत काडतुसे असा एकूण ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल मिळून आला. पोलिसांनी हा शस्त्रसाठा जप्त केला असून आरोपीविरुद्ध भारतीय शस्त्र अधिनियम कलम ३/२५ अन्वये गुन्हा नोंदवून कायदेशीर कारवाई केली आहे.

आरोपीवर यापूर्वीही गंभीर गुन्हे दाखल

पकडण्यात आलेला आरोपी करण भटनागर हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असून त्याच्याविरुद्ध यापूर्वी अमळनेर पोलीस ठाण्यात भादंवि कलम ३०७ (खुनाचा प्रयत्न), दंगल व शस्त्र अधिनियमान्वये गंभीर गुन्हा दाखल आहे. तसेच जामखेड पोलीस ठाण्यातही (जि. अहिल्यानगर) त्याच्यावर शस्त्र अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल असल्याचे तपासात उघड झाले आहे. सदर धडक कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, प्रभारी पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख व उपविभागीय पोलीस अधिकारी राजीव नवले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक शेखर औटे, पोलीस हवालदार अशोक दुबाले, आनंद मस्के, सोमनाथ गायकवाड, बाळासाहेब सानप व चालक पोलीस अंमलदार सिद्धेश्वर मांजरे यांच्या पथकाने ही कामगिरी बजावली.

मुलांनो शिक्षणाची जिद्द ठेवा तुम्ही नक्कीच यशस्वी व्हाल - शाम गायकवाड

वडवणी । प्रतिनिधी

शिक्षण हेच प्रगतीचे प्रभावी साधन असून समाजातील प्रत्येक मुलाने शिक्षणाची जिद्द, चिकाटी आणि मेहनत करण्याची तयारी ठेवली पाहिजे. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी कठोर परिश्रम आणि आत्मविश्वासाच्या जोरावर यशाचे शिखर गाठता येते. त्यामुळे पालकांनी आपल्या मुलांना उच्च शिक्षण द्यावे आणि त्यांना प्रशासकीय सेवेत जाण्यासाठी प्रोत्साहित करावे असे प्रेरणादायी आवाहन वडवणी पोलीस ठाण्याचे पीएसआय शाम गायकवाड यांनी केले.



वडवणी येथे प्रशासकीय सेवेत विविध पदांवर कार्यरत असलेल्या नाभिक समाजातील मान्यवरांचा शिवरत्न जिवाजी महाले जयंती उत्सव समिती, वडवणी यांच्या वतीने शाल, पुष्पहार आणि शिवरत्न जिवाजी महाले यांची प्रतिमा भेट देऊन सन्मानपूर्वक गौरव करण्यात आला. समाजातील गुणवंतांचा सन्मान करून नव्या पिढीसमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वडवणी पोलीस ठाण्याचे पीएसआय शाम गायकवाड होते.प्रमुख पाहुणे म्हणून दुय्यम निबंधक अधीक्षक बालाजी गोरे, सिनिअर प्रा.रवि गोरे,मॅनेजर वैभव शिंदे यांची उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना पीएसआय शाम गायकवाड म्हणाले की, माझाही प्रवास अत्यंत खडतर परिस्थितीतून झाला आहे. मी देखील ग्रामीण भागातून आलो असून मेहनत, जिद्द आणि सातत्याच्या जोरावर आज या पदापर्यंत पोहोचलो आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील किंवा सर्वसामान्य परिस्थितीतील विद्यार्थ्यांनी कोणत्याही अडचणीमुळे खचून जाऊ नये. मनात मोठे ध्येय ठेवून शिक्षण घेतल्यास यश निश्चित मिळू शकते.समाजातील एखादी व्यक्ती उच्च पदावर पोहोचली तर तिचा अभिमान बाळगण्याबरोबरच इतर विद्यार्थ्यांनाही तिच्याकडून प्रेरणा मिळाली पाहिजे. समाजातील प्रत्येकाने एकमेकांना प्रोत्साहन देत प्रगतीच्या प्रवाहात सहभागी करून घेतले पाहिजे असेही त्यांनी सांगितले.

वडवणीतील समाजबांधवांनी दिलेले प्रेम आणि आपुलकी मी कधीही विसरणार नाही. समाजाची सर्वांगीण प्रगती व्हायची असेल तर प्रत्येक कुटुंबातील मुलांनी उच्च शिक्षण घेतले पाहिजे. समाजातील तरुणांनी मोठी स्वप्ने पाहावीत, मेहनत करावी आणि उच्च पदांवर जाऊन समाजाचे नाव उज्ज्वल करावे. स्वतःची प्रगती करताना समाजातील इतरांनाही सोबत घेऊन पुढे जाणे महत्त्वाचे आहे असे भावनिक आवाहन गायकवाड यांनी केले. यावेळी उपस्थित नाभिक समाजबांधवांना शिवरत्न जिवाजी महाले यांची प्रतिमा भेट देण्यात आली. समाजातील प्रशासकीय अधिकारी व मान्यवरांचा सन्मान झाल्याने उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. या उपक्रमातून समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची प्रेरणा मिळण्यासोबतच प्रशासकीय सेवेत जाण्याची नवी उमेद निर्माण होईल असा विश्वास व्यक्त करण्यात आला.यावेळी शंतनु शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार जगदीश गोरे यांनी केले. प्रास्ताविक युवराज शिंदे यांनी केले तर आभार अमोल राऊत यांनी मानले. या कार्यक्रमास वडवणी तालुक्यातील समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बीडमध्ये २५ डिसेंबरला शिक्षकांची राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा



बीड । प्रतिनिधी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ऐतिहासिक शाळा प्रवेश दिनाला १२६ वर्षे पूर्ण होत असल्याच्या औचित्याने नालंदा फाऊंडेशन, बीडच्या वतीने शिक्षकांसाठी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा येत्या २५ डिसेंबर २०२६ रोजी सकाळी ९ वाजता तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, आदर्श नगर, डी.पी. रोड, बीड येथे आयोजित करण्यात आली आहे.

या स्पर्धेसाठी तीन विषय निश्चित करण्यात आले आहेत. यामध्ये १) कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातील शिक्षक : नव्या संधी, नवी आव्हाने' २) 'महात्मा ज्योतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा गुरु-शिष्य कार्यात्मक अनुबंध आणि ३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राज्यघटना निर्मितीत योगदान या विषयांचा समावेश आहे.

सहभागी शिक्षकांना या तीन विषयांपैकी कोणत्याही एका विषयावर ७ ते १० मिनिटांच्या कालावधीत आपले वक्तृत्व सादर करावे लागणार आहे. स्पर्धेतील प्रथम क्रमांकाच्या विजेत्यास २५ हजार रुपये, द्वितीय क्रमांकास १५ हजार रुपये, तर तृतीय क्रमांकास १० हजार रुपये रोख पारितोषिक देण्यात येणार आहे. याशिवाय विजेत्यांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क ५०० रुपये निश्चित करण्यात आले असून, दि. १ नोव्हेंबर ते २२ डिसेंबर २०२६ या कालावधीत नावनोंदणी करता येणार आहे. विशेष म्हणजे, स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व शिक्षकांसाठी आयोजकांच्या वतीने एक वेळ मोफत भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. राज्यातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, पदवी, पदव्युत्तर तसेच विद्यापीठस्तरावरील शिक्षकांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी होऊन आपली नावनोंदणी करावी, असे आवाहन मुख्य संयोजक तथा नालंदा फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे यांनी केले आहे. स्पर्धेच्या नावनोंदणीसाठी व सविस्तर माहितीसाठी ७९९०७६०१५१ आणि ९५६१८१७४७४ या क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

बीड शासकीय तंत्र प्रशालेस स्व. सुदामकाका भोंडवे यांचे नाव




बीड । प्रतिनिधी

सुदामकाका भोंडवे यांनी भारतरत्न नानाजी देशमुखांच्या प्रेरणेतून ऊसतोड कामगार व छोट्या शेतकऱ्यांच्या मुलांसाठी ४० वर्षांपूर्वी सोनदरा गुरुकुलाची स्थापना केली. गेल्या चाळीस वर्षात मराठवाड्यातील शेकडो विद्यार्थी उत्तम संस्कार व शिक्षणाच्या पायावर विविध क्षेत्रांमध्ये यशस्वीरित्या कार्यरत आहेत. त्यांच्या कामापासून प्रेरणा घेऊन त्यांच्या विद्यार्थी कार्यकर्ते व अन्य व्यक्तींनी मराठवाड्यात सुमारे नऊ दहा शिक्षणविषयक प्रकल्प सुरू केले आहेत. २१ फेब्रुवारी २०२३ रोजी झालेल्या दुर्दैवी अपघातात सुदाम काका आणि त्यांच्या तीन कुटुंबीयांचे निधन झाल्यानंतरही सोनदरा गुरुकुलाचे कार्य प्रगतीपथावर सुरू आहे.

विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी सर्वस्व अर्पण केलेल्या स्व. सुदामकाका भोंडवे यांचे नाव बीड येथील शासकीय तंत्र प्रशालेस देण्याचा अध्यादेश ६ नोव्हेंबर रोजी काढण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्याचे कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता मंत्री माननीय मंगल प्रसाद लोढा यांच्या पुढाकारामुळे हे पाऊल टाकण्यात आले आहे. यामुळे मराठवाडा व बीडमधील शिक्षणप्रेमी आणि सोनदरा गुरुकुल परिवाराने समाधान व्यक्त केले आहे.

सौताडा येथील रामेश्वर दरीत वाघाचा वावर, ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण

पेढे विक्रेते रमेश गिरी यांनी पाहिला वाघ; परिसरात उडाली खळबळ



पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील प्रसिद्ध धार्मिक व पर्यटन स्थळ असलेल्या सौताडा येथील रामेश्वर दरी परिसरात वाघ आढळल्याची माहिती समोर आली आहे. पेढे विक्रेते रमेश गिरी यांनी दरीत वाघ पाहिल्याने परिसरात एकच खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये तीव्र भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रमेश गिरी हे वाघाला पाहून प्रचंड घाबरले आहेत.

दरी परिसरात वाघाने एखाद्या प्राण्याची शिकार केल्याचीही चर्चा आहे. सौताडा आणि रामेश्वर दरी परिसरात नेहमीच पर्यटकांची व नागरिकांची रेलचेल असते, तसेच शेतकरी आपली जनावरे चरण्यासाठी याच भागात नेतात. त्यामुळे नागरिकांची चिंता आणखी वाढली आहे. वन विभागाने तातडीने दक्षता घ्यावी!

सौताडा वन विभागाने या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन परिसराची पाहणी करावी, वाघाच्या वावराचा शोध घ्यावा आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

दीपावलीनिमित्त सर्व शेतकरी बांधव, व्यापारी, शिक्षक व जनतेला हार्दिक शुभेच्छा...!



कांतीशेठ चाणोदिया
अध्यक्ष - अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ,कडा

कामधेनू कृषी सेवा केंद्र, धानोरा
कामधेनू ट्रेडिंग कंपनी, धानोरा
कामधेनू लॉन्स ॲण्ड मंगल कार्यालय, धानोरा / हिवरा
कामधेनू मिल्क धानोरा, ता. आष्टी, जि.बीड



शांतीशेठ चाणोदिया
संचालक कामधेनु उद्योग समुह, धानोरा



दिवाळी निमित्त
जिल्ह्यातील तमाम जनतेस
हार्दिक शुभेच्छा...!



---* शुभेच्छुक *---
प्रा.बबनराव आंधळे सर
संस्थापक अध्यक्ष ग्रामीण युवक संघटना महाराष्ट्र राज्य तथा संचालक बीड जिल्हा सहकार बीड

दीपावलीच्या अमाप शुभेच्छा...!



स्वामी विवेकानंद
शिक्षकांची सहकारी पतसंस्था मर्या., कडा
ता. आष्टी,जि.बीड फोन : ०२४४१-२३९७५०

क्रेडिट रेटिंग
CRISIL = BBB-/Stable (Assigned)
ऑडिट वर्ग अ

नवा गंध, नवा वास,
नव्या रांगोळीची नवी आरास
स्वप्नांतले रंग नवे
आकाशातले असंख्य दिवे.



मारुती पठाडे (चेअरमन)



अशोक लटपटे (व्हा. चेअरमन)



महेशकुमार शिंदे (मानदसचिव)

संचालक मंडळ : हिरामण पोकळे, विठ्ठल शिंदे, आप्पासाहेब काळे, नितीन कर्डुळे, प्रविण मेहेरकर, चंद्रशेखर खाडे, संजय काळे, पोपट बोराडे, आदिनाथ गर्जे, गोरक्ष गोरे, रत्नाकार चव्हाण, स्वानंद थोरवे, श्रीमती मनिषा होळकर, श्रीमती शैला सातपुते, वैजीनाथ रायते (लिपीक - कॉम्प्युटर, श्रीमती आसराबाई सांगळे (रोजंदारी सेवक), ज्ञानदेव जाधव (रोजंदारी सेवक)

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
रविवार दि.८ नोव्हेंबर २०२६
४

केंद्र सरकारकडून शेतकऱ्यांना दिलासा!

पीक नुकसानीसाठी प्रति हेक्टर ११, हजार ते ३० हजार रुपयांपर्यंतची मदत मिळणार

दिल्ली / वृत्तसंस्था

केंद्र सरकारने एनडीआरएफ सहाय्यतेचे निकष सुधारित केले आहे. आता बिगरसिंचन पिकांसाठी प्रति हेक्टर ११,००० रुपये आणि सिंचन पिकांसाठी प्रति हेक्टर २२,००० रुपये मिळतील. मृतांच्या कुटुंबीयांना आता ८ लाख रुपये मिळतील.

मिळालेल्या माहितीनुसार आता शेतकऱ्यांना पीक नुकसानीसाठी प्रति हेक्टर ११,००० ते ३०,००० रुपयांपर्यंतची मदत मिळेल. तसेच मृत्यू पावलेल्यांच्या कुटुंबीयांना आता ८ लाख रुपये मिळतील तर पशुधन, कुक्कुटपालन आणि घरांच्या नुकसानीसाठीच्या सहाय्यतेची रक्कमही वाढवण्यात आली आहे. नवीन नियमांनुसार, शेतकऱ्यांना आता बिगरसिंचन पिकांच्या नुकसानीसाठी प्रति हेक्टर ११,००० रुपये आणि सिंचन पिकांच्या नुकसानीसाठी प्रति हेक्टर २२,००० रुपये मिळतील. फळबागांच्या नुकसानीसाठीची रक्कमही प्रति हेक्टर ३०,००० रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे. याशिवाय, पशुधन, कुक्कुटपालन आणि घरांच्या नुकसानीसाठीच्या मदतीची रक्कमही वाढवण्यात आली आहे. केंद्र सरकारने आपत्ती



व्यवस्थापन निधी अंतर्गत आर्थिक मदतीसाठीचे निकष सुधारित केले आहे. नवीन मानकांनुसार, नैसर्गिक आपत्तीत एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास, त्यांच्या कुटुंबाला ४ लाख रुपयांऐवजी ८ लाख रुपयांची आर्थिक मदत मिळेल. पूर्णपणे नुकसान झालेल्या घरासाठीची मदत १,२५,००० रुपयांवरून १,६०,००० रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे. दुर्गम भागात घर पूर्णपणे कोसळल्यास, ही रक्कम १,३०,००० रुपयांवरून १,७०,००० रुपयांपर्यंत वाढवली जाईल.

नवीन मानकांची अंमलबजावणी करण्यासाठी, महाराष्ट्र सरकारला मंत्रिमंडळाच्या बैठकीत याला मंजुरी द्यावी लागेल. त्यामुळे, १ एप्रिलनंतर झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना वाढीव दराने मदत मिळेल की नाही याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

राज्य सरकारने यापूर्वी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी केंद्र सरकारकडे ३१,००० कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर केला होता. केंद्र सरकारचे सुधारित मदतीचे मानक २०२६-२७ या आर्थिक वर्षापासून सुरू होऊन २०२६-२७ ते २०३०-३१ या पाच वर्षांसाठी लागू केले जातील. त्यामुळे, १ एप्रिल २०२६ नंतर होणाऱ्या आपत्तींमुळे होणाऱ्या नुकसानीसाठी सुधारित दराने मदत मिळण्याची शक्यता आहे.

दिन विशेष

महत्वाच्या घटना

१८८९ : मोंटाना हे अमेरिकेचे ४१ वे राज्य बनले.
१८९५ : दुसराच एक प्रयोग करत असताना विल्हेम रॉंटजेन यांना क्ष किरणांचा शोध लागला.
१९३२ : अखिल भारतीय अस्पृश्यता निवारक संघाच्या महाराष्ट्र शाखेची स्थापना.
१९३९ : म्युनिक येथे ॲडॉल्फ हिटलर प्राणघातक हल्ल्यातुन बचावला.
१९४७ : पंजाब अँड हरयाणा उच्च न्यायालयाची स्थापना.
१९६० : अटीतटीच्या लढतीत रिचर्ड निक्सन यांचा पराभव करुन जॉन एफ. केनेडी अमेरिकेचे ३५ वे राष्ट्राध्यक्ष बनले.
१९८७ : पुणे मॅरेथॉनचे पंतप्रधान राजीव गांधी यांच्या हस्ते शानदार उद्घाटन. पुणे मॅरेथॉन ही स्पर्धा खासदार सुरेश कलमाडी यांनी सुरु केली.
१९९६ : कवी व लेखक प्रा. माणिक गोडघाटे ऊर्फ ग्रेस यांची विदर्भ साहित्य संघाच्या जीवनव्रती पुरस्काराचे पहिले मानकरी म्हणून निवड.
२००२ : जी. बी. पटनायक यांनी भारताचे ३२ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
२०१६ : तत्कालीन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ५०० आणि १००० च्या नोटा व्यवहारातून रद्द केल्या.
२०१६ : डोनाल्ड ट्रम्प अमेरिकेचे वे४५ अध्यक्ष म्हणून निवडून आले.


जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६५६ : खगोलशास्त्रज्ञ एडमंड हॅले यांचा जन्म. धूमकेतूची कक्षा मोजणारे पहिले शास्त्रज्ञ. (मृत्यू: १४ जानेवारी १७४२)
१८३१ : भारताचे वे३० गव्हर्नर-जनरल रॉबर्ट बुलवेर-लिटन यांचा जन्म. (मृत्यू: २४ नोव्हेंबर १८९१)
१८६६ : ऑस्टिन मोटर कंपनीचे संस्थापक हर्बर्ट ऑस्टिन यांचा जन्म. (मृत्यू: २३ मे १९४१)
१८९३ : थायलँडचा राजा प्रजाधिपोक ऊर्फ राम (सातवा) यांचा जन्म. (मृत्यू: ३० मे १९४१)
१९०९ : स्वातंत्रसैनिक व पत्रकार नरुभाई लिमये यांचा जन्म. (मृत्यू: ३० ऑगस्ट १९९८)
१९१७ : कर्करोग संशोधन क्षेत्रातील अग्रणी शास्त्रज्ञ डॉ. कमल रणदिवे यांचा जन्म. (मृत्यू: ११ एप्रिल २०००)
१९१९ : प्रसिद्ध लेखक, नाटककार, संगीतकार, दिग्दर्शक, पटकथालेखक आणि अभिनेते पुरूषोत्तम लक्ष्मण उर्फ पु. ल. देशपांडे यांचा जन्म. (मृत्यू: १२ जून २००० पुणे)
१९२० : भारतीय अभिनेत्री, नृत्यांगना सितारादेवी यांचा जन्म. (मृत्यू: २५ नोव्हेंबर २०१४)
१९२७ : भारताचे उपपंतप्रधान, केन्द्रीय माहिती व नभोवाणी मंत्री, भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांचा जन्म.
१९५३ : भारतीय राजकारणी नंद कुमार पटेल यांचा जन्म. (मृत्यू: २५ मे २०१३)
१९७० : मायस्पेस चे सहसंस्थापक टॉम एंडरसन यांचा जन्म.
१९७४ : नारुतो चे जनक मसाशी किशिमोतो यांचा जन्म.
१९७६ : ऑस्ट्रेलियाचा जलदगती गोलंदाज ब्रेट ली यांचा जन्म.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२२६ : फ्रान्सचा राजा लुई (आठवा) यांचे निधन. (जन्म: ५ सप्टेंबर ११८७)
१६७४ : कवी, विद्वान व मुत्सद्दी जॉन मिल्टन यांचे निधन. (जन्म: ९ डिसेंबर १६०८)
१९६० : भारतीय हवाई दलप्रमुख सुब्रतो मुखर्जी यांचे निधन.
२०१३ : भारतीय पत्रकार आणि अभिनेते अमांची वेंकत सुब्रमण्यम यांचे निधन. (जन्म: २ जानेवारी १९५७)
२०१५ : भारतीय एअर मर्शल ओमप्रकाश मेहरा यांचे निधन. (जन्म: १९ जानेवारी १९१९)
२०१५ : उद्योगपती लॉर्ड स्वराज पॉल यांचे सुपुत्र तसेच कँपॅरो ग्रुपचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंगद पॉल यांचे अपघाती निधन.

डिसेंबर महिन्यात लागवड करता येणारी मुख्य पिके



भाजीपाला पिके :

कांदा (रब्बी): डिसेंबर महिना रब्बी कांद्याची पुनर्लागवड (रोप लावणे) करण्यासाठी सर्वात योग्य मानला जातो. वांगे आणि टोमॅटो: या काळात वांगी आणि टोमॅटोच्या रोपांची लागवड करता येते. मेथी, पालक आणि कोथिंबीर: कमी कालावधीत भरपूर उत्पन्न देणाऱ्या या पालेभाज्यांची पेरणी डिसेंबरमध्ये उत्तम होते. कोबी आणि फ्लॉवर: थंडीच्या दिवसांत यांची वाढ चांगली होते आणि बाजारात मागणीही जास्त असते. मुळा, गाजर आणि बीट: या मूळवर्गीय भाजीपाल्याची पेरणी डिसेंबरच्या पहिल्या पंधरवड्यात करावी.

कडधान्ये व गळित धान्य पिके :

हरभरा (उशिरा होणारा): ज्या शेतात उशिरा पाणी उपलब्ध होते किंवा आधीचे पीक उशिरा निघाले असेल, तिथे हरभऱ्याची उशिरा येणारी वाण पेरावीत. सूर्यफूल व करडई: थंड हवामानात या तेलबिया पिकांची लागवड उत्तम मानली जाते.

नगदी व चारा पिके : ऊस (काडेलोट / रब्बी): रब्बी हंगामातील उसाची लागवड डिसेंबरमध्ये केली जाते. बरसीम आणि मका (चारा): जनावरांसाठी हिरव्या चाऱ्याची सोय म्हणून बरसीम किंवा चाऱ्याच्या मक्याची पेरणी करू शकता.

डिसेंबरमधील लागवडीसाठी काही महत्त्वाच्या टिप्स : थंडीपासून संरक्षण: लहान रोपांवर किंवा भाजीपाल्यावर धुक्याचा (धुके/तुषार) परिणाम होऊ नये म्हणून संध्याकाळी किंवा सकाळी पिकाला हलके पाणी द्यावे. खतांचे व्यवस्थापन: या दिवसांत पिकांची वाढ थोडी मंद असते, त्यामुळे योग्य प्रमाणात सेंद्रिय व रासायनिक खतांचा डोस द्यावा.

कीड-रोग नियंत्रण: थंडी आणि धुक्यामुळे करपा किंवा तांबेरा सारख्या रोगांचा प्रादुर्भाव होऊ शकतो; त्यामुळे फवारणीकडे वेळेवर लक्ष द्या.

अझोला शेती आणि त्याचे फायदे !



अझोला एक जलचर फर्न वनस्पती आहे. ही वनस्पती पाण्याच्या पृष्ठभागावर वाढते. कमी खर्चात तयार होणारे जनावरांसाठी पौष्टिक खाद्य म्हणून अझोला उत्तम पर्याय आहे. दुधाळ गाई व म्हशी यांच्या आहारात अझोलाचा वापर केल्यास दूध उत्पादन वाढते. कोंबड्यांच्या आहारात अझोलाचा वापर केल्यास अंडी उत्पादनात वजन वाढीवर अनुकूल परिणाम होतो. अझोला हे गुरेढोरे, मासे, डुक्कर, ससे, मेंढ्या, शेळ्या आणि कुक्कुटपालनासाठी एक आदर्श खाद्य आहे. अझोला हे जैव खत म्हणून वापरले जाते. या पिकाची लागवड चीन, व्हिएतनाम आणि फिलीपिन्स इ. देशांमध्ये लोकप्रिय आहे. हे पीक नायट्रोजन स्थिर करण्यास मदत करते.

लागवड प्रक्रिया : अझोला तयार करण्यासाठी जागा सपाट आणि तणरहीत करून घ्यावी. अझोला लागवडीसाठी कृत्रिम तलाव तयार करावा लागतो. तलाव तयार करण्यासाठी छायांकित क्षेत्र निवडावे, कारण अझोलाला ३०% सूर्यप्रकाश आवश्यक असतो व जास्त सूर्यप्रकाशामुळे पिक नष्ट होते. तलाव तयार करण्यासाठी मोठ्या व छोट्या आकाराचाही बनवू शकतो किंवा मार्केटमध्ये प्लास्टिकचे बेड उपलब्ध असतात तर आपण तेही वापरू शकता. खड्ड्यामध्ये १० ते १५ किलो चाळलेली सुपीक माती समप्रमाणात पसरवून घ्यावी. पाण्याची नासाडी टाळण्यासाठी प्लास्टिकचा कागद जमिनीवरती पसरवावी. यानंतर १० लिटर पाण्यामध्ये चांगले कुजलेले शेण ५ किलो, ३० ते ३५ ग्रॅम सुपर फॉस्फेट आणि २० ग्रॅम खनिज मिश्रण मिसळून घ्यावे व हे द्रव मातीवर सारख्या प्रमाणात पसरवून घ्यावे. खड्ड्यामध्ये स्वच्छ व ताजे पाणी १० सेंटीमीटर उंचीपर्यंत भरावे व त्यातील मिश्रण तळाला स्थिर झाल्यानंतर १.५ ते २ किलो ताजा व शुद्ध अझोला पाण्यावर सोडावा. १० ते १५ दिवसानंतर अझोला ची वाढ झालेली दिसून येते. अशाप्रकारे एका खड्ड्यातून दररोज १.५ ते २ किलो अझोला चे उत्पादन मिळते.

काय काळजी घेतली पाहिजे : अझोलाची चांगली वाढ होण्यासाठी दर आठ दिवसांनी १ ते २ किलो शेण व ३० ग्रॅम सुपरफॉस्फेट, २० ग्राम खनिजे मिश्रण पाण्यात मिसळावे. दर १० दिवसांनी खड्ड्यातील २५% पाणी बदलवावे व दर दोन महिन्यानंतर पन्नास टक्के माती बदलून नवीन सुपीक माती टाकावी. यात शेणाचा वापर जास्त करू नये. मुंग्या, वाळवी, किडे यापासून बचाव करावा. खड्ड्यातील पाण्य पातळी ४ ते ५ इंचापर्यंत कायम ठेवावी जेणेकरून अझोलाची मुळे खड्ड्यातील अन्नघटक चांगल्या प्रकारे शोषून घेतील. याला झाकण्यासाठी शेडनेटचा वापर करावा. पाण्याचा सामू (झक) ६.५ ते ७.५ इतका असावा जेणेकरून अजून याची वाढ चांगली होते व जास्त क्षार असलेल्या पाण्यात अझोलाची वाढ होत नाही. तलावातील कल्चर हे दर सहा महिन्याने बदलवावे. तयार झालेला अझोला रोज काढावा अन्यथा थर जमा होऊन रोगाचा प्रादुर्भाव वाढू शकतो व अझोला खराब होतो.

पशुंना अझोला देण्याची पद्धत : अझोला वापरण्यापूर्वी स्वच्छ धुवावा, कारण अझोला शेणाचा वास येत असल्यामुळे तो जनावर खात नाही. अझोला देताना पशुखाद्यात १:१ या प्रमाणात मिसळून द्यावा त्यानंतर हळूहळू अझोलाचे प्रमाण वाढवावे. प्रतिदिन जनावरांना एक ते दीड किलो अझोला खायला द्यावा.

अझोलाचे फायदे : पशुखाद्याचा २० ते २५ टक्के खर्च कमी होतो. पशु आहारात अझोलाचा वापर केल्यास दूध उत्पादनात १५ ते २०% वाढ होते व त्याचबरोबर दुधातील फॅटचे प्रमाण वाढते. कोंबड्यांमध्ये अंडी देण्याचे प्रमाणही वाढते व ब्रॉयलर कोंबड्यांचे वजन लवकर वाढते. अझोला वाफ्यातून काढण्यात येणाऱ्या पाणी हे नत्रयुक्त व खनिजयुक्त असल्याने पिकांसाठी किंवा झाडांसाठी उपयुक्त असते. अझोला मध्ये नत्राचे प्रमाण अधिक आहे व याचा हिरवळीचे खत म्हणून देखील वापर होतो.

जाहीर प्रगटन

मा. श्री एम. ए. शिंदे, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड यांच्या न्यायालयात.

किरकोळ दिवाणी अर्ज ४५१/२०२६

मार्फत :- ॲड. जे. एस. पठाण

इशाक व इतर विरुध्द निरंक

अर्जदार :- १. इसाक पि. ख्वाजा शेख, वय ५५ वर्षे, धंदा शेती, २. यासिन पि. ख्वाजा शेख, वय ६५ वर्षे, धंदा शेती, ३. यास्मीन भ्र. रशिदखॉ पठाण, वय ६३ वर्षे, धंदा घरकाम, अर्जदार क्र. १ व २ रा. डोंगरकिन्ही ता. पाटोदा जि. बीड, ह.मु. धनोरी पुणे, अर्जदार क्र. ३ रा. आष्टी ता. आष्टी जि. बीड.

विरूध्द निरंक

मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.. वरील अर्जदार क्र. १ ते ३ यांनी या न्यायालयात मयत ख्वाजा पि. रेहेमान शेख यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी ख्वाजा पि. रेहेमान शेख यांचा मृत्यु दिनांक २५/१२/२००७ रोजी पुणे येथे झाला असुन अर्जदार क. १ व २ हे मयताचे मुले असून अर्जदार क. ३ ही मयताची विवाहित मुलगी आहे. वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत अथवा त्यांच्या व्यतिरीक्त इतर कोणी मयताचे वारस आहेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत ख्वाजा पि. रेहेमान शेख यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक ०५ नोव्हेंबर २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १४ डिसेंबर २०२६.

स्वाक्षरित
आदेशावरुन
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क. स्तर,
पाटोदा. ता. पाटोदा, जि. बीड.

स्वाक्षरित
क. लिपीक

जाहीर प्रगटन

मा. श्री एम. ए. शिंदे, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड यांच्या न्यायालयात.

किरकोळ दिवाणी अर्ज ४५७/२०२६

मार्फत ॲड. जे. एस. पठाण

इनताज व इतर विरुध्द निरंक

अर्जदार :- १. इनताज भ्र. बाबुलाल शेख, वय ५८ वर्षे, धंदा घरकाम, २. रमजान पि. बाबुलाल शेख, वय ३५ वर्षे, धंदा शेती, ३. दौलत भ्र. नझिरूद्दीन शेख, वय ५३ वर्षे, धंदा घरकाम, ४. युनुस पि. महंमद शेख, वय ५८ वर्षे, धंदा शेती, अर्जदार क्र. १,२ व ४ रा. डोंगरकिन्ही ता. पाटोदा जि. बीड, अर्जदार क्र. २ ह.मु. विश्रांतवाडी, गुंजाळ वस्ती, धानोरी रोड, शांतीवन सोसायटीजवळ, पुणे, अर्जदार क. ३ रा. गावडेवाडी शिरासवाडी, पुणे.

विरूध्द निरंक

मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार क्र. १ ते ४ यांनी या न्यायालयात मयत महंमद पि. रहमान शेख यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी महंमद पि. रहमान शेख यांचा मृत्यु दिनांक २३/१२/१९९५ रोजी विश्रांतवाडी, पुणे येथे झाला असुन अर्जदार क्र. १ ही मयताचा मयत मुलगा बाबुलाल याची पत्नी असून मयताची सुन आहे. तसेच अर्जदार क्र. २ हा मयताचा मयत मुलगा बाबुलाल याचा मुलगा असून मयताचा नातू आहे. तसेच अर्जदार क्र. ३ ही मयताची विवाहित मुलगी आहे. व अर्जदार क. ४ हा मयताचा मुलगा आहे. वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरह अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत अथवा त्यांच्या व्यतिरीक्त इतर कोणी मयताचे वारस आहेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरह मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरह कोर्ट सदरह अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत शेख कासम पि. शेख करीम यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०६ नोव्हेंबर २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १५ डिसेंबर २०२६.

स्वाक्षरित
आदेशावरुन
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क. स्तर,
पाटोदा. ता. पाटोदा, जि. बीड.

स्वाक्षरित
क. लिपीक

जाहीर प्रगटन

मा. श्री एम. ए. शिंदे, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड यांच्या न्यायालयात.

किरकोळ दिवाणी अर्ज ४५३/२०२६

मार्फत ॲड. जे. एस. पठाण

सलिमा व इतर विरुध्द निरंक

अर्जदार : १. सलिमा भ्र. अब्बास शेख, वय ६५ वर्षे, धंदा घरकाम,२. जावेद पि. अब्बास शेख, वय ४३ वर्षे, धंदा शेती,३. अब्दुल्ला पि. कासम शेख, वय ६१ वर्षे, धंदा शेती, ४. जाऊद्दीन पि. कासम शेख, वय ५६ वर्षे, धंदा शेती, अर्जदार क्र. ३ व ४ ह. मु. सव्हें नं. ११, पर्णकुटी पेठ, येरवडा, पुणे, अर्जदार क्र. १ ते ४ रा. डोंकरकिन्ही ता. पाटोदा जि. बीड. विरूध्द निरंक

मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.. वरील अर्जदार क्र. १ ते ४ यांनी या न्यायालयात मयत शेख कासम पि. शेख करीम यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी शेख कासम पि. शेख करीम यांचा मृत्यु दिनांक १२/०९/१९९७ रोजी स. नं. ११, येरवडा, पुणे येथे झाला असुन अर्जदार क्र. १ ही मयताचा मयत मुलगा अब्बास याची पत्नी असून मयताची सुन आहे. व अर्जदार क्र. २ हा मयताचा मयत मुलगा अब्बास यांचा मुलगा असून मयताचा नातू आहे. तसेच अर्जदार क्र. ३ व ४ हे मयताचे मुले आहेत.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरह अर्जदार सदरह मयताचे वारस नव्हेत अथवा त्यांच्या व्यतिरीक्त इतर कोणी मयताचे वारस आहेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरह मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरह कोर्ट सदरह अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत शेख कासम पि. शेख करीम यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०५ नोव्हेंबर २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १४ डिसेंबर २०२६.

स्वाक्षरित
आदेशावरुन
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क. स्तर,
पाटोदा. ता. पाटोदा, जि. बीड.

स्वाक्षरित
क. लिपीक

जाहीर प्रगटन

मा. श्री एम. ए. शिंदे, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड यांच्या न्यायालयात.

किरकोळ दिवाणी अर्ज ४५५/२०२६

मार्फत ॲड. जे. एस. पठाण

रजिया व इतर विरुध्द निरंक

अर्जदार : १. रजिया भ्र. अन्वर खान, वय ६९ वर्षे, धंदा घरकाम, २. रियाजुद्दीन पि. शरफुद्दीन शेख, वय ५९ वर्षे, धंदा शेती, ३. अमिनुद्दीन पि. शरफुद्दीन शेख, वय ५० वर्षे, धंदा घरकाम, अर्जदार क्र. १ ते ३ रा. डोंगरकिन्ही ता. पाटोदा जि. बीड.

विरूध्द निरंक

मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.. वरील अर्जदार क्र. १ ते ३ यांनी या न्यायालयात मयत शरफुद्दीन रेहमान शेख यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी शरफुद्दीन रेहमान शेख यांचा मृत्यु दिनांक ०८/०५/२०१८ रोजी येरवडा, पुणे येथे झाला असुन अर्जदार क्र. १ ही मयताची विवाहित मुलगी असून अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले आहेत.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरह अर्जदार सदरह मयताचे वारस नव्हेत अथवा त्यांच्या व्यतिरीक्त इतर कोणी मयताचे वारस आहेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत शरफुद्दीन रेहमान शेख यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक ०५ नोव्हेंबर २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १५ डिसेंबर २०२६.

स्वाक्षरित
आदेशावरुन
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क. स्तर,
पाटोदा. ता. पाटोदा, जि. बीड.

स्वाक्षरित
क. लिपीक





























स्वच्छ दिवाळी-शुभ दिवाळी सर्व नागरिकांना
दिवाळीच्या पर्यावरण पूरक शुभेच्छा.

नगर पंचायत मंठा

Email: npmantha@gmail.com

नागरिकांनी खालील कर्तव्य पारपडून नगर पंचायतेस सहकार्य करावे.

१. दुष्काळाची गंभीर परिस्थिती लक्षात घेता पाण्याचा वापर जपून करा.
२. वाहन, अंगण रस्ते धुण्यासाठी व इतर ठिकाणी पाण्याचा आवश्यक वापर टाळावा.
३. उपलब्ध पाण्याचा वापर पिण्यासाठी व आवश्यक गरजांसाठी प्राधान्याने करावा.
४. पाण्याचा आवश्यक वापर टाळावा व प्रशासनास सहकार्य करावे.
५. पाणी टंचाई परिस्थिती लक्षात घेता पिण्याचा पाण्याचा वापर बांधकामासाठी करण्यात येऊ नये.
६. प्लास्टिक बंदी आपण करूया सगळे कापडी पिशवी वापरूया. Say No To Plastic)
७. घरातील ओला व सुका कचरा वेगळा करा नगरपंचायत ला सहकार्य करा.
८. फटाके मुक्त दिवाळी साजरी करा पर्यावरणाचे प्रदूषण टाळा.
९. मालमत्ता, पाणीपट्टी कर व इतर कर वेळेवर भरून नगरपंचायतीस सहकार्य करा.
१०. कचरा मुक्त शहर,(GFC) स्वच्छ सर्वेक्षण २०२६ मध्ये मंठा शहराला मानांकन मिळवण्यासाठी कचरा घंटागाडीत टाकून सहकार्य करा.
११. स्वच्छ मंठा, सुंदर मंठा, निरोगी राहील सर्व जनता, कचराकुंडीतच कचरा टाकावा व इतरत्र नाल्यामध्ये, रस्त्यावर कचरा फेकू नये.
१२. सार्वजनिक शौचालायचा वापर करून शहराला हागणदारी मुक्त शहर (ODF+/ODF++) मानांकन मिळवण्यासाठी नगर पंचायतेस सहकार्य करा.
१३. धोकादायक इमारती असल्यास स्वत:हून सदर बांधकाम काढून टाकावे व जीवितहानी टाळावी.

स्वाक्षरित
मुख्याधिकारी
नगर पंचायत मंठा







































This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26